**आरोपी व त्यांचे विधिज्ञ वारंवार पुकारा केला असता गैरहजर. साक्षीदार अरबाज याकुब शेख सकाळी ११.०० वाजल्यापासुन न्यायालयात साक्षीकरीता हजर. करीता फौ.प्र.सं.कलम ३०९ मधील तरतुदीस अधीन राहुन साक्षीदाराची साक्ष आरोपीच्या अनुपस्थीतीत घेण्यात येत आहे.**

नि.फौ.ख.क्र.१५२/२०२२
शासन विरुध्द सनी
नि.क्र.**२२**

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.२**

मी देवाची शपथ खरे सांगतो की,
माझे नाव – समीर रशीदभाई बागवान ,
वय – ४८ वर्षे, कामधंदा – फळ व्यवसाय,
राहणार – ५९३, गणपती आळी, वाई, ता. वाई.

**सरतपास सहायक सरकारी अभियोक्ता श्रीमती जाधव –**

दि. ०२/०३/२०२२ रोजी सायंकाळी ५ वाजताच्या सुमारास मी माझे कुटुंबीयांसह आमच्या वाई येथील घराला कुलूप लावून पुण्याला नातेवाईकांना भेटण्याकरीता गेलो होतो. मी माझ्या घरासमोरच फळ विक्री व्यवसाय करतो. माझे घर मंडई मच्छी मार्केट येथे आहे. माझ्या घरासमोरील भागास लागूनच लोखंडी जाळीचे शेड आहे व तेथेच मी माझे फळ विक्रीचा व्यवसाय करतो. आम्ही ज्यावेळी पुण्याला गेलो. त्यावेळी माझ्या दुकानात द्राक्षांनी भरलेले दहा कॅरेट ठेवले होते. आम्ही घरातून बाहेर पडताना त्यावेळी मुख्य घराला व जाळीचे शेडला कुलूप लावले होते. दि ०५/०३/२०२२ रोजी सकाळी १०.०० वाजता वाई येथील घरी परतलो. तेव्हा मी पाहिले की, शेडच्या जाळीला असलेले कुलूप नव्हते. मी आत जावून पाहिले असता द्राक्षाचे एक कॅरेटसुध्दा आढळून आले नाही. तसेच तेथील लाकडी गल्ल्यात ठेवलेले र.रु २४००/– तेथे नव्हते. त्यामुळे मी माझा भाउ युसूफ बागवान यांस तेथे बोलाविले. त्यानंतर आम्ही आमच्या शेजारी

असलेले डॉ बारगजे यांच्या दवाखान्यात लावलेले सी सी टी व्ही फुटेज चेक केले. तेव्हा असे दिसून आले की, आरोपी सनी जाधव हा दि ०२/०३/२०२२ रोजीचे रात्री ०२.३० वाजताचे सुमारास माझे दुकानातील कॅरेट नेत होता. मी त्यास पूर्वीपासूनच ओळखायचो कारण तो नेहमीच मच्छी मार्केटला येत असे. त्या द्राक्षाच्या कॅरेटची किंमत अंदाजे र रु ८००/– होती. मी घटनेची फिर्याद दिली होती. आता मला ती दाखविली. ती तीच आहे त्यावर माझी सही आहे त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **निशाणी २३** देणेत येते.

दुसरे दिवशी पोलिस घटनास्थळी आले होते व त्यांनी पंचांसमक्ष पंचनामा कार्यवाही केली होती. मी आरोपी सनी जाधव यांस पाहिल्यास ओळखू शकतो. (आरोपी आज न्यायालयात गैरहजर आहे.) मला माझे चोरीस गेलेले कॅरेट पोलिस ठाण्यातून परत मिळाले आहे. ते रिकामे होते. तथापि चोरीस गेलेली रोख रक्कम मला परत मिळाली नाही.

**उलटतपास आरोपीतर्फे विधिज्ञ श्रीमती देवकर**

**आरोपी व त्यांच्या विधिज्ञांचा वारंवार पुकारा केला असता गैरहजर.**

**प्रकरण उलटतपासाकरीता तहकूब.**

समक्ष व श्रवणोत्तर स्वीकृत,

*स्वाक्षरी/–*

दि.१३.०९.२०२३

(आर.एम. भेंडे)

न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,

न्यायालय क्र.२,वाई.